THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 23RD JANUARY 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल यांच्या कायदे व कानू करण्याच्या कौन्सिलांत खालीं दिलेला आक्टाचा मसुदा तारीख २० माहे डिसेंबर रोजीं रुजू करण्यांत आला :—

### सन १८८९ चा नंबर १६.

### सन १८६७ चा आक्ट २५ वा सुधारण्याबाबद आक्टाचा मसुदा.

सन १८६७ चा आक्ट २५ वा (छापण्याच्या प्रेसी व वर्तमानपत्रें यांबाबद नियम ठरविण्याविषयीं व ब्रिटिश इंडियांत छापलेले बुकांच्या (पुस्तकांच्या) प्रती सांभाळून ठेवण्याविषयीं व सदर्हू बुकें नोंदण्याविषयीं आक्ट) हा सुधारणें ज्या अर्थी योग्य आहे, त्या अर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. सदर्हू आक्टाच्या अवतरणांतील "तीन तीन" हे शब्द यावरून रद्द केले आहेत. — *सन १८६७ चा आक्ट २५ याच्या अवतरणांतील कांहीं अंश रद्द केला आहे.*

२. सदर्हू आक्टाच्या १ ल्या कलमांतील "माजिस्ट्रेट" या शब्दाच्या व्याख्येंतले "व जस्टीस आफ धि पिसाचा" हे शब्द यावरून रद्द केले आहेत. — *सन १८६७ चा आक्ट २५ याच्या १ ल्या कलमाचा कांहीं अंश रद्द केला आहे.*

३. सदर्हू आक्टाचें कलम ९ यांत, "अदालतीचे ज्या हे कोर्टांचे किंवा इतर कोर्टांचे अवल दिवानी फिर्यादी घेण्याचे मामुल हुकुमतीचे स्थलसीमेंत सदर्हू प्रकारचा इकरार केला असेल त्या हे कोर्टाचे किंवा इतर कोर्टांचे" या मजकुराऐवजीं, "अदालतीच्या हे कोर्टाचे किंवा सदर्हू इकरार जेथें केला असेल त्या जागीं अवल हुकुमत असणाऱ्या इतर मुख्य दिवानी कोर्टाचे" हा मजकूर दाखल करावा. — *सन १८६७ चा आक्ट २५, कलम ९, याची सुधारणा.*

सन १८६७ चा भाग ३, या बदला नवीन भाग दाखल करणें.

४. सदर्हू आक्टाचा भाग ३ रा (कलमें ९, १० व ११) याच्या बदला खालीं दिलेला मजकूर दाखल करावा :—

आक्ट अमलांत आल्यानंतर छापिलेल्या बुकांच्या प्रती सरकारास फुकट दिल्या पाहिजेत.

"९. हा आक्ट अमलांत आल्यानंतर जें जें बुक ब्रिटिश इंडियांत खिळ्याचे छापानें किंवा शिळेवर छापण्यांत येईल त्या त्या सगळ्या बुकाच्या खिळ्याचे छापानें किंवा शिळेवर छापलेल्या प्रती, त्यां संबंधाचे नकाशे, छाप व इतर चित्रें यांच्या ज्या उत्तम प्रती काढिल्या असतील त्याप्रमाणें तयार केलेल्या व रंगविलेल्या त्या नकाशांच्या, छापांच्या व इतर चित्रांच्या प्रतींसुद्धां, आणि तसेंच, त्या बुकाची जी कोणतीहि दुसरी अगर पुढील आवृत्ति, त्याच्या संबंधाच्या मजकुरांत, अगर नकाशांत अगर छापांत अगर इतर चित्रांत भर घालून अगर फेरफार करून सदरीं सांगितल्याप्रमाणें तयार केली असेल तिच्या प्रती, अशा बुकाची पहिली आवृत्ति हा आक्ट अमलांत आल्यानंतर तयार झालेली असो, अगर पूर्वी तयार झालेली असो, आणि (तें बुक प्रसिद्ध केलेलें असल्यास) तें बुक प्रसिद्ध करणारा व छापणारा यांच्या दरमियान कोणतीहि कबुलायत झालेली असली तरी, स्थानिक सरकार सरकारी गॅझेटांत वेळोवेळीं जाहिरनामा देऊन सांगेल त्या जागीं व त्या अमलदाराकडे सरकारास खर्च पडल्याशिवाय खालीं लिहिल्याप्रमाणें दिल्या पाहिजेत : ह्मणजे—

(अ) प्रत्येक बुकाच्या बाबतींत, तें छापखान्यांतून बाहेर काढिल्याच्या दिवसापासून एक क्यालेंडर महिन्याच्या आंत सदर्हू प्रकारच्या दोन प्रती;

(ब) अशा दिवसानंतर एका क्यालेंडर वर्षाच्या आंत स्थानिक सरकारानें तसा हुकुम केला तर, छापणारास त्याप्रमाणें हुकुम केल्याच्या दिवसापासून एका क्यालेंडर महिन्याच्या आंत, तें सरकार सांगेल त्याप्रमाणें तशी दुसरी एक प्रत अगर पराकाष्ठा दोन प्रती;

याप्रमाणें दिलेल्या प्रती बांधलेल्या असाव्या, किंवा शिवलेल्या असाव्या, किंवा दोरा घातलेल्या असाव्या, व जशा उत्तम कागदावर त्या बुकाच्या कोणत्याहि प्रती खिळ्याचे छापानें किंवा शिळेवर छापिल्या असतील, तशा उत्तम कागदावर त्या प्रती खिळ्याचे छापानें किंवा शिळेवर छापिलेल्या असाव्या.

"ज्या प्रसिद्ध करणारानें किंवा इतर मनुष्यानें छापणारास बुक छापण्याचें काम दिलें असेल त्यानें, सदर्हू महिना संपण्यापूर्वी माफक वेळांत, छापणारास सदरील हुकुम मान्य करितां येण्यासाठीं सदरीं सांगितल्याप्रमाणें तयार केलेले व रंगविलेले जे नकाशे, छाप आणि चित्रें जरूर असतील, तीं त्यास दिलीं पाहिजेत.

"या कलमाच्या पहिल्या भागांतील कोणताहि ठराव, कलम ९ यांतील कानूंस अनुसरून मुदतीमुदतीनें प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांस लागू नाहीं असें समजावें.

गेल्या शेवटल्या कलमाअन्वयें दिलेल्या प्रतींबद्दल पावती दिली पाहिजे.

"१०. गेल्या शेवटल्या कलमाअन्वयें ज्या अमलदाराकडे बुकाची प्रत दिली जाईल त्यानें तिच्या बदल छापणारास लेखी पावती दिली पाहिजे.

कलम ९अन्वयें दिलेल्या प्रतींची व्यवस्था करणें.

"११. या आक्टाच्या ९ व्या कलमाच्या पहिल्या पारिग्राफांतील (अ) रकमेअन्वयें दिलेल्या दोन प्रतींपैकीं एका प्रतीची व्यवस्था हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे सामान्य किंवा विशेष हुकुम करून वेळोवेळीं फर्मावितील त्याप्रमाणें करावी, आणि दुसरी प्रत स्थानिक सरकार वेळोवेळीं ठरवील त्या सार्वजनिक पुस्तकालयांत ठेवावी अगर त्या सरकारच्या वेळोवेळच्या हुकुमाप्रमाणें तिची व्यवस्था करावी.

सदरीं सांगितलेल्या पारिग्राफांतील (ब) रकमेअन्वयें कोणतीहि एक प्रत दिली असल्यास, ती ब्रिटिश म्यूझिअम संग्रहालयास अगर सेक्रेटरी आफ स्टेट फार इंडिया यांजकडे पाठवावी, आणि दोन प्रती दिल्या असल्यास, त्या ब्रिटिश म्यूझिअम संग्रहालयास आणि सदई सेक्रेटरी आफ स्टेट यांजकडे पाठवाव्या."

५. सदई आक्टाच्या १२ व्या, १३ व्या, १४ व १५ व्या कलमांतील "त्यावर त्या गोष्टीची माजिस्ट्रेटासमक्ष शाबिती झाली असतां" हा मजकूर या कलमावरून रद्द केला आहे.

सन १८६७ चा आक्ट २५ याच्या १२ व्या, १३ व्या, १४ व्या व १५, कलमांतील कांहीं मजकूर रद्द केला आहे.

६. सदई आक्टाच्या १६ व्या व १७ व्या कलमांच्या ऐवजीं खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें :—

सन १८६७ चा आक्ट २५ याचीं कलमें १६ व १७ यां ऐवजीं नवीन कलमें दाखल करणें.

बुकें न दिल्याबद्दल अगर छापणारास नकाशे न पुरविल्याबद्दल शिक्षा.

"१६ या आक्टाचे ९वे कलमांत सांगितलेले प्रकारचे कोणतेहि बुकाचा किंवा त्या बुकाचे कोणतेंहि दुसरे किंवा पुढले आवृत्तीचा जो कोणताहि छापणारा त्या कलमाबरहुकुम त्या पुस्तकाच्या अगर आवृत्तीच्या प्रती देण्यास हयगय करील त्यास, तशा प्रत्येक चुकीबद्दल, त्या प्रती ज्या अमलदाराकडे द्यावयास पाहिजे होत्या त्या अमलदाराच्या अगर या बाबतींत त्या अमलदारानें अधिकार दिलेल्या कोणत्याहि मनुष्याच्या सूचनेवरून, तें बुक ज्या जागीं छापिलें असेल त्या जागीं हुकुमत असणारा माजिस्ट्रेट सर्व गोष्टी ध्यानांत आणून त्या चुकीबद्दल दंडादाखल वाजवी म्हणून पन्नास रुपयांपेक्षां जास्त नाहीं अशी जी रकम ठरवील, ती दिली पाहिजे, आणि छापणाऱ्यानें ज्या प्रती आणून द्यावयास पाहिजे होत्या, त्या प्रतींची जी किंमत तो माजिस्ट्रेट ठरवील, तिची रकम त्या दंडाशिवाय आणखी दिली पाहिजे.

"अशा कोणत्याहि छापणारास बुक छापण्याचें काम ज्यानें दिलें असेल असा कोणताहि प्रसिद्ध करणारा अगर इतर मनुष्य, या आक्टाच्या ९व्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफांत सांगितल्याप्रमाणें त्या छापणारास, त्या कलमाच्या ठरावाअन्वयें वागतां यावें यासाठीं त्यास जरूर असतील ते नकाशे, छाप अगर चित्रें देण्याची हयगय करील, त्या प्रसिद्ध करणारास अगर इतर मनुष्यास, तशा प्रत्येक चुकीबद्दल, सदई प्रकारच्या सूचनेवरून सदई प्रकारचा माजिस्ट्रेट, सर्व गोष्टी ध्यानांत आणून त्या चुकीबद्दल दंडादाखल वाजवी म्हणून पन्नास रुपयांपेक्षां जास्त नाहीं अशी जी रकम ठरवील, ती दिली पाहिजे, आणि प्रसिद्ध करणाऱ्यानें अगर इतर मनुष्यानें त्या छापणाऱ्यास जे नकाशे, छाप अगर चित्रें पुरविले पाहिजे होते त्यांची तो माजिस्ट्रेट ठरवील ती किंमत त्या दंडाशिवाय आणखी दिली पाहिजे.

"१७. गेल्या शेवटल्या कलमाअन्वयें सरकारास दंडादाखल देणें झालेली रकम वसूल करणें तीं, दंड वसूल करण्याच्या संबंधाची जी रीत विवक्षित काळीं अमलांत असलेले फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींच्या कायद्यांत सांगितली असेल त्या रीतीप्रमाणें आणि त्याच संबंधाची जी मुदत हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा यांत सांगितला असेल त्या मुदतीच्या आंत, ती ठरविणाऱ्या माजिस्ट्रेटाच्या अगर त्याच्या स्थानापन्नाच्या वारंटाबरहुकूम वसूल करण्याचा अखत्यार आहे.

दंडादाखल देणें झालेल्या रकमा वसूल करणें व त्यांचा व दंडाच्या रकमांची व्यवस्था करणें.

"या आक्टाच्या या भागाखालीं झालेले सर्व दंड अगर दंडादाखल दिलेली रकम हीं वसूल झाल्यानंतर त्यांची व्यवस्था स्थानिक सरकार वेळोवेळीं फर्मावील त्या प्रमाणें करावी."

७. सदई आक्टाच्या १८व्या कलमांत "या आक्टाचे ९ वे कलमाअन्वयें" या मजकुराऐवजीं "या आक्टाचे ९ वे कलमाच्या पहिल्या पारिग्राफांतील (अ) रकमेअन्वयें" हा मजकूर दाखल करावा.

सन १८६७ चा आक्ट २५ याच्या १८ व्या कलमाची सुधारणा.

८. सदई आक्टाचें २२ वें कलम यावरून रद्द केलें आहे.

सन १८६७ चा आक्ट २५ याचें २२ वें कलम रद्द केलें आहे.

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

या मसुद्याचे मुख्य हेतु येणेंप्रमाणें आहेत:—

(अ) आजपर्यंत पुस्तक छापणारास सरकाराला दरेक पुस्तकाच्या तीन प्रती द्याव्या लागत; त्या आतां दोन द्याव्या लागतील, असें ठरविणें;

(ब) ब्रिटिश म्यूझिअम व सेक्रेटरी आफ् स्टेट यांना पाठविण्यासाठीं जास्त प्रती मागण्याचा स्थानिक सरकारास अधिकार देणें;

(क) सन १८६७ च्या २५ व्या आक्टाअन्वयें सरकारास दिलेल्या प्रतींची सरकारानें किंमत दिली पाहिजे हा नियम रद्द करणें.

हिंदुस्तानांत ठेवण्यासाठीं प्रत्येक पुस्तकाच्या दोन प्रती मागवाव्या लागतात, आणि ब्रिटिश म्यूझिअमच्या ट्रस्टींस आणि सेक्रेटरी आफ स्टेट यांस तें पुस्तक इंग्लंडांतहि ठेवण्याजोगतें आहे असें वाटल्यास त्या संग्रहालयास व इंडिया आफिसांस पाठविण्यासाठीं जास्त प्रती मागवाव्या लागतात.

व्हिक्टोरिआ महाराणीच्या कारकीर्दीच्या ५ व्या व ६ व्या वर्षांतील स्टाट्यूटाचा चाप्टर ४५ याअन्वयें पुस्तकाच्या ज्या प्रती, मागितल्याशिवाय ब्रिटिश म्यूझिअमास आणि मागणीनंतर आक्सफर्डच्या बोडलीयन लायब्ररीस, केंब्रिज येथील पब्लिक लायब्ररीस, एडिंबरो येथील फाकल्टी आफ आड्व्होकेट्स यास, आणि डब्लीन येथील ट्रिनिटी कालेजास पुरवाव्या लागतात त्या फुकट द्याव्या लागतात; आणि सरकारचा असा अभिप्राय आहे कीं, हिंदुस्तानच्या कायद्यावरून स्थानिक सरकारच्या हुकुमाबरहुकुम ज्या प्रती सरकारास द्याव्या लागतात, त्या फुकट मिळाव्या असें ठरविण्याची आतां वेळ आली आहे. ज्या मसुद्यावरून सन १८६७ चा २५ वा आक्ट झाला, तो मसुदा कौन्सिलांत रुजू केला तेव्हां, सरकारास दिलेल्या प्रतींची किंमत देण्याबद्दल ठराव केल्यापासून सरकारावर अमर्याद मागण्या केल्या जातील अशी शंका आली होती; आणि ती शंका आतां खरी ठरली आहे.

हा मसुदा रुजू करण्याचे दुसरेहि कांहीं उद्देश आहेत; ते हे:—सन १८६७ च्या आक्टाचे जे भाग निरुपयोगी झाले आहेत ते रद्द करणें, कलमें ( २,५ व ८ ); त्या आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें केलेल्या इकराराची एक अवल प्रत, इलाका शहरांच्या हद्दींबाहेर आटोतें दप्तरीं ठेवणें ती डिस्ट्रिक्ट कोर्टांत ठेवावी असें ठरविणें ( कलम ३ ) ; आणि त्या आक्टाच्या १६ व्या व १७ व्या कलमांची रचना सुधारणें (कलम ६).

(सही) फिल. पी. हचिन्स,

तारीख १९ माहे डिसेंबर सन १८८९.

एस. हार्वे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्तान सरकार.

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.